# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार — EDUTECH E-mail : desk16@dte.org.in Internet :http/www.dte.org


क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०११/शा१५७०
दिनांक : १७.१.२०१२

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

विषय : गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत आयोजित करावयाच्या शिबिरांबाबत व आस्थापनाविषयक इतर विषयांबाबत विभागीय कार्यशाळा

उपरोक्त विषयासंदर्भात शासनाचे पत्र क्रमांक गोपअ-२०११/प्र.क्र.८६-२०११/आस्था-२, दिनांक १२.१.२०१२ पहावे.

सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणेबाबतच्या तसेच गोपनीय अहवालांच्या पूर्ततेकरिता प्रतिवेदन व पुनर्विलोकनासाठी कॅम्प आयोजित करण्यात येत असून त्यासंदर्भातील वेळापत्रक सोबत जोडत आहे. तरी, आपल्या अधिपत्याखालील संस्था व कार्यालये यामधील संबंधित अधिका-यांना त्या त्या विभागील कार्यशाळांना उपस्थित राहण्याच्या सूचना त्वरित देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

( ए.सी. अत्तार )
प्र. उपसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई

जा.क्रं.विकापु/आस्था /२०१२/ ५२२
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे
दिनांक २०.०१.२०१२

21 JAN 2012

प्रति,
सर्व प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
/तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

या कार्यालयाचे अधिपत्याखालील संस्थांना कळविण्यात येते की, वर पत्रात नमूद केल्याप्रमाणे संबधित अधिका-यांना मा.आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालयात दिनांक २३ जानेवारी २०१२ रोजी कार्यशाळेसाठी प्रतिनियुक्त करण्यात यावे.

(डी.एन.शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत- संगणक विभाग संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

महत्त्वाचे
विभागीय कार्यशाळा

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : गोपअ-२०११/प्र.क्र. ८६-२०११/आस्था-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२.१.२०१२

प्रति,

आयुक्त (व्यवसायप्रशिक्षण), संचालक (उच्चशिक्षण / व्यवसायशिक्षण /तंत्रशिक्षण /कला / ग्रंथालय)
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.

**विषय : गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत आयोजित करावयाच्या शिबिरांबाबत व आस्थापनाविषयक इतर विषयांबाबत विभागीय कार्यशाळा...**

**संदर्भ :** समक्रमांकाचे शासनपत्र दिनांक १९.१२.२०११

%

उपरोक्त विषयासंदर्भातील, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.१.२०१२ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणेबाबतच्या **तसेच** गोपनीय अहवालांच्या पूर्ततेकरिता प्रतिवेदन व पुनर्विलोकनासाठी कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना यापूर्वीच आपणांस कळविण्यात आलेल्या आहेत.

आता, यासंदर्भात **तसेच** अन्य महत्त्वाच्या आस्थापनाविषयक बाबींसंदर्भात, राज्यातील ६ महसुली विभागांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी, सोबतच्या पत्रात दिलेल्या वेळापत्रकानुसार, विभागीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी आपल्या अधिपत्याखालील विविध विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना, त्या-त्या विभागातील कार्यशाळांना उपस्थित राहण्याच्या सूचना **त्वरित** देण्यात याव्यात व त्याबाबत शासनास अवगत करण्यात यावे, ही विनंती.

**( बा. मं. राऊत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

पत्र प्राप्त झाले
13 JAN 2012

शा-१५७०
१६/१/२०१२

# महाराष्ट्र शासन

**महत्वाचे**

क्रमांक : सीएफआर-१२११/प्र.क्र.२१७/का.१३,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हूतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ जानेवारी, २०१२

**प्रति,**

**सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,**
**सर्व मंत्रालयीन विभाग.**

**विषय : आस्थापना विषयकबाबींसंदर्भातील कार्यशाळा.**

संदर्भ : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-१२१०/ प्र.क्र.४७/ २०१०/१३, दि.१.११.२०११
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-१२११/ प्र.क्र.२१७/१३, दि.१७.१२.२०११.

महोदय/महोदया,

अखिल भारतीय सेवेतील व राज्य शासकीय सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यासंदर्भात शिबिरे आयोजित करण्याबाबतच्या सूचना उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. त्या अनुषगाने पूर्वतयारीसाठी मंत्रालयीन विभागातील आस्थापना अधिकाऱ्यांना **गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत आयोजित करावयाच्या शिबीरांबाबत तसेच, आस्थापना विषयक इतर विषयासंदर्भात** मार्गदर्शन करण्यासाठी मंत्रालयीन स्तरावरील कार्यशाळा बुधवार दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी झाली. सदर कार्यशाळेत स्पष्ट केल्यानुसार या विषयासंदर्भात राज्यातील ६ महसुली विभागांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी **खालीलप्रमाणे विभागीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.**

| अ.क्र. | महसुली विभाग | कार्यशाळेचा दिनांक |
|---|---|---|
| १ | कोकण विभाग | दिनांक १७ जानेवारी, २०१२ |
| २ | नाशिक विभाग | दिनांक १७ जानेवारी,२०१२ |
| ३ | नागपूर विभाग | दिनांक २० जानेवारी,२०१२ |
| ४ | पुणे विभाग | दिनांक २३ जानेवारी, २०१२ |
| ५ | औरंगाबाद विभाग | दिनांक २३ जानेवारी, २०१२ |
| ६ | अमरावती विभाग | दिनांक २४ जानेवारी, २०१२ |

२. या विभागीय कार्यशाळेत मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी **खालील विषयांवर मार्गदर्शन** करतील.

१) गोपनीय अहवाल समय मर्यादेत प्रतिवेदीत करणे, पुनर्विलोकन करणे व संस्करण करुन त्यांचे जतन करणे.
(संबंधित शासन निर्णय दिनांक १.११.२०११ व दिनांक १७.१२.२०११)

स/श्रीम. पाटील

२) ज्येष्ठता सूची बाबत सुधारीत आदेशाची माहिती देणे.
(शासन निर्णय दि.२१.१०.२०११ )

३) सरळसेवा व पदोन्नतीने नियुक्तीची प्रक्रिया तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र पाठविणे. (संबंधित शासन निर्णय दिनांक २४.०२.२०११, ०८.०४.२०११ व अधिसूचना दिनांक ०८.०६.२०१०)

४) मागसवर्गीय आरक्षण निश्चितीची प्रक्रिया. (शासन अधिसूचना २४.०१.२००४)

५) विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप कार्यप्रणाली.
(संबंधित आदेश-अधिसूचना दिनांक ०८.०६.२०१०)

३. सदर कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी संबंधित कार्यक्षेत्रातील आपल्या विभागाच्या नियंत्रणाखालील वर नमूद केलेले विषय हाताळणाऱ्या संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांना (प्रादेशिक विभाग प्रमुख/विभाग प्रमुख/जिल्हा कार्यालय) सदर कार्यशाळेत निश्चितपणे सहभागी होण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

४. तसेच, कार्यशाळेसाठी येताना उपरोक्त नमूद शासन निर्णय/आदेशांचा अभ्यास करुन व या शासन निर्णय/आदेशांच्या प्रतींसह उपस्थित राहण्याच्या देखील सूचना द्याव्यात, जेणेकरुन सदर कार्यशाळा चर्चास्वरुप (Interactive) राहील.

५. सदर कार्यशाळेसंदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित महसुल आयुक्तांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याच्या सूचना देखील संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात.

आपला

(पां.जो.जाधव)
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रत,

१. प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
२. प्रधान सचिव (साविस) सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहायक
३. सर्व विभागीय आयुक्त

******